Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076
EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# अभ्यासक्रम प्रत्याभरण संकल्पना व स्वरूप

**प्रा.डॉ.गोपालकृष्ण गणपतराव कुंभरे**
स्वावलंबी शिक्षण महाविद्यालय, वर्धा

## प्रास्ताविक

शैक्षणिक प्रक्रियेवर अकुंश ठेवण्यासाठी अभ्यासक्रम प्रत्याभरणाची आवश्यकता आहे. या प्रक्रियेचे नुतनीकरण करण्यासाठी प्रक्रियेतील घटकाकडुन प्रत्याभरण घेणे व निकालातून या प्रक्रियेतील प्रत्याभरणाच्या घटकाला काय जाणवले किंवा वाटले यांच्यावर शैक्षणिक प्रक्रियेचा विकास किंवा अधोगती दिसुन येते प्रत्याभरणाची दोन प्रकार आहेत.

१) सकारात्मक प्रत्याभरण.

२) नकारात्मक प्रत्याभरण,

प्रत्याभरणातील घटक आपले मत दर्शविण्यासाठी वरील प्रकाराचा उपयोग करतो. अभ्यासक्रम प्रत्याभरतातील घटक शिक्षक, विद्यार्थी, समाज, पालक व शाळा यांचा प्रामुख्याने सहभाग असतो म्हणून प्रत्याभरनात या घटकाचा विचार करून प्रत्याभरन घेणे जरूरी आहे. त्यासाठी अभ्यासक्रम प्रत्याभरण ही प्रक्रिया शालेय व्यवहारात अत्यंत महत्वाची आहे.

**अ) अभ्यासक्रम प्रत्याभरण संकल्पना व स्वरूप** –शिक्षणात विद्यार्थ्यां एवढे महत्व दुसऱ्या कोणत्याही घटाकाचे असू शकत नाही. शिक्षणाची पध्दती व्यवस्था, प्रशासन हि संपूर्ण यंत्रणा विद्यार्थ्यांसाठीच असते आणि म्हणून त्यावर लक्ष केंद्रित करून संपूर्ण शालेय उपक्रम प्रशासन आणि कारभार, चालवित गेला पाहीजे. एक अपरिपक्व व्यक्तिमत्व, कौटुंबिक वातावरणातून निघून संस्कारासाठी शालेय वातावरणात प्रवेश करित असते. शाळा म्हणजेच संस्कार केंद्रे जे संस्कार करावयाचे असतात ते बालकांवर त्याच्या भावी जीवनाच्या सर्वांगीन तयारी साठी म्हणून करावयाचे जणे करून तो कुटुंब, समाज, आणि राष्ट्र या तिन्हीचाही एक वास्तवादी जीवन जगणारा घटक ठरेल. शिक्षणाचा हा सारा खटाटोप अट्टाहासामुळे त्याच्यासाठी असतो आणि म्हणूनच शिक्षणाचे केंद्र बालक मानले गेले आहे. अभ्यासक्रमही आता बालकेंद्रीत तयार केलेला आहे. बालकावर करावयाच्या संस्कारात महत्वाची बाब जर कोणती असेल तर बालकाकडून मिळणाऱ्या प्रत्याभरणाची आहे.

**प्रत्याभरण म्हणजे काय?** प्रत्याभरण म्हणजे बालकावर जे संस्कार केले जातात त्या संस्काराचे प्रतिसाद आपल्याला त्याच्या वर्तनातून दिसू लागतात त्यालाच अभ्यासक्रम प्रत्याभरण असे म्हणतात . प्रत्याभरणात कर्तव्य व जबाबदारी यांची जाणीव करून देणे हि होय. कर्तव्य पार पाडणे जबाबदाऱ्या जोखीम स्विकारणे यासाठी एक विशेष प्रकारची मनोवृत्ती तयार करावी लागते .

या संबंधी केलेले संस्कार नुसते विद्यार्थी जिवनात नव्हे तर भावी जिवनातही अत्यंत उपयोगी पडतात व दिसून येतात. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना कर्तव्ये व जबाबदाऱ्या याचे एक प्रकारे बाळकडू पाजणे हे शालेय जीवनातच आवश्यक ठरते

### ब) अभ्यासक्रम प्रत्याभरणातील घटक -

**(१) विद्यार्थी (Student)-** प्रत्येक विद्यार्थीची अध्ययनशैली, गरजा अभिरूची हया भिन्न असतात. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातून बोधात्मक, भावानात्मक व कियात्मक विकास होत असतो . विद्यार्थ्यांचे मत व निवड ही देखील अभ्यासक्रमाची महत्वाची बाब आहे. अभ्यासक्रम हा विद्यार्थी केंद्रीत असल्यामुळे त्याची अंमलबजावणी करतांना विद्यार्थ्यांचा विचार करूनच अध्यापनाची आखणी केली जाते. विद्यार्थ्यांचा शारिरीक, बौध्दिक, भावनिक, मानसिक, सामाजिक इ . विकास साधण्यासाठी

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

एक आदर्श भावी नागरिक होण्यासाठी अभ्यासक्रम हा विद्यार्थी केंद्रीत आहे. विद्यार्थ्यांला अभ्यासक्रमातून वाचन, लेखन, अंकज्ञान, भाषा, विज्ञानुभव, संगीत, खेळ, जीवनव्यवहार, स्वच्छतेवर आधारीत उपक्रम, सामाजिक सहसंबंधांवर आधारीत उपक्रम असे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अनुभव दिले जातात. यामधुन विद्यार्थ्यांची कार्यशक्ती वाढते व मनुष्यबळ विकासास चालना मिळते.

**(२) शाळा (School)-** अंमलबजावणी शाळेत होत असते. त्यामुळे अभ्यासक्रमाच्या प्रगतीसाठी, विकासासाठी शाळाच अधिक जबाबदार असतात. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, समन्वयक, पर्यवेक्षक, अनुदेशक, विभागाचे अध्यक्ष यांचीही जबाबदारी वाढते.

### अभ्यासक्रमाच्या बाबतीत शाळांची जबाबदारी -

शाळांनी अभ्यासक्रमविषयक बाबींचा अभ्यास करण्यासाठी वित्त संसाधनांची गुंतवणुक केली पाहिजे. अभ्यासक्रमाची व अध्यापनाची गुणवत्ता टिकविण्यासाठी शिक्षकांपेक्षा शाळाच अधिक जबाबदार असतात. अनुदेशन साहित्य पुरवण्याची व अभ्यासक्रम अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचणी सोडवण्याची जबाबदारी शाळांची असते. अभ्यासकम विकासासाठी मर्मदृष्टी व कौशल्ये विकसित करण्याचेही कार्य शाळेचेच असते. शाळेतील शिक्षकवृंद हे अभ्यासक्रम परिणामकारकपणे राबवण्यासाठी अभ्यासक्रमाचे खरे कार्यकर्ते आहेत. थोडक्यात, अभ्यासक्रमाची आखणी झाल्यानंतर त्याची यशस्वीरित्या ही अंमलबजावणीवर असते. त्या अभ्यासक्रमाला यशस्वी करायचे की, अयशस्वी करायचे ही जबाबदारी शाळांची असते.

**(३) समाज (Society)-** जॉर्ज पेन यांनी शिक्षणाची तीन कार्ये सांगितली आहेत.

परंपरांचा स्विकार, नवसामाजिक पध्दतीचा विकास व सर्जनशील व विधायक कार्ये ही शैक्षणिक कार्ये पुर्ण करण्यासाठी समाजाने शाळा या संस्थेची निर्मिती केली. शाळेमध्ये होणारी आंतरक्रिया, सामाजिकीकरण व समायोजन या तिन्ही प्रक्रिया विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला आकार देत असतात. त्यामुळे अभ्यासक्रमक राबवितांना समाजाचा विचार, समाजाचा अभ्यासक्रमातील सहभाग महत्वाचा आहे. समाजातील संस्कृती, धार्मिक, नैतिक संस्कार, नागरिकत्व, सामाजिक समायोजन इ. वृत्तींचा विकास हा समाज व शाळा मिळुन विद्यार्थ्यांमध्ये रूजवत असतात. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. समाजाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक उन्नती, समाजाची जडणघडण ही शिक्षणावर आधारलेली आहे. तसेच उद्याचा भारत व भावी नागरिक घडविण्याची जबाबदारी शिक्षणाची आहे. त्यामुळे अभ्यासक्रम हा समाजभिमुख असला पाहिजे. अभ्यासक्रमात समाजाचा विचार व समाजाने अभ्यासकम विकसनासाठी केलेली वाटचाल महत्वाची आहे.

**क) अभ्यासक्रम प्रत्याभरणाचे फायदे -** अभ्यासक्रम प्रत्याभरणामुळे शालेय संचलना मधील सर्व घटक त्यात शालासमिती किंवा व्यवस्थापक मंडळ मुख्याध्यापक शिक्षक, विद्यार्थी पालक, आणि समाज यांना आपल्या कर्तव्य आणि जवाबदाऱ्यांची जाणिव निर्माण होते. व प्रत्येक घटकाला आपली जबाबदारी समजून कार्य करित असते.

### व्यवस्थापकला :

शालेय संचलनाला योग्य शैक्षणिक वातावरणाची निर्मिती करून देणे.

मानवी अमानवी घटकाचे योग्य नियोजनाद्वारे व्यवस्थापन करणे.

आर्थीक कमतरता दुर करणे.

समाजात आदराचे स्थान निश्चित करणे

समाजाचा व राष्ट्राचा विकास करणे.

### मुख्याध्यापकाला :

कर्णधार या नात्याने उत्तम प्रशासन करणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

समाज व विद्यार्थी यांच्याशी चांगले संबंध.

शिक्षकांना मार्गदर्शन व सहकार्याची भावना दाखविने.

शाळेची प्रतिमा नावलौकिकवास आणने.

शाळेसंबंधी आदराची भावना जोपासने.

## शिक्षक :

उत्तम अध्यापकाचे कार्य करतात.

विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देण्याच्या दृष्टीने प्रयत्न.

अध्ययन व अध्यापकाचा व्यासंग वाढविने.

पालकशिक्षक संघाचे आयोजन करणे.

व्यावसायीक विकास करणे.

## पालक :

शाळेविषयी आदर करणे

शाळेला किंवा मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या विषयी सहकार्याची भावना ठेवणे

सभेस उपस्थित राहणे व मार्गदर्शन करणे किंवा सल्ला देणे

शाळेस अनुदान प्राप्त करून देणे

शाळेच्या विकासात दखल घेणे

## समाज :

समाज या नात्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी सामाजिक प्रयत्न करणे.

समाजात श्शाळेचा सहभाग घेणे

सामाजिक कार्यात शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक याना निमंत्रीत करणे.

शाळेला सहकार्य करणे.

शाळेचे नावलौकीक होईल यासाठी प्रयत्न करणे

## सारांश :

शिक्षण प्रणालीमध्ये महत्वाचा घटक विद्यार्थी आहे .शिक्षण व्यवस्थेतील संपूर्ण यंत्रणा हि विद्यार्थ्यांसाठी असते म्हणून विद्यार्थ्यांवर संस्कार करण्यासाठी विविध उपक्रमाचा विचार करून उपक्रम राबवून बाल केंद्रीत अभ्यासक्रमाचा त्याचे कडून प्रत्याभरण घेणे व त्याचे अभ्यासक्रम प्रत्याभरणा संबंधीचे कर्तव्य व जबाबदारी विषयी जाणिव करून देणे या सर्व बाबींचा फायदा त्याच्या संपूर्ण जीवनात होईल याची जान करून देणे. अभ्यासक्रमातील घटक विद्यार्थी आहे त्याचा या अभ्यासक्रमातून कसा विकास होतो हे यातून स्पष्ट होते . विद्यार्थी व अभ्यासक्रम यांच्या संबंधातून त्याचा शारिरीक, भावनिक, सामाजिक, बौध्दिक, मानसिक, सौंदर्य दृष्टीचा विकास, कलात्मक, नैतिक विकास, सर्जनशिलतेचा विकास, राष्ट्रीय प्रवृत्तीचा विकास अभ्यासक्रमातून दिसून येतो. अभ्यासक्रम अंमल बजावणीत शाळेत होत असल्यामुळे अभ्यासक्रमाच्या प्रगतीसाठी शाळाच अधिक जबाबदार असल्यामुळे शाळेतील संपूर्ण मानवी घटकावर जवाबदारी असते. जाच्या विकासासाठी समाजाने शाळा या संस्थेची निर्मिती केली. शाळेमध्ये होणाऱ्या आंतरिक्रिया व विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व व सर्वांगीन विकासासाठी शाळा व समाज कार्य करत संस्कार रूजवितात शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन असून समाजाचा संपूर्ण विकास करणे जडण घडण करणे व उदयाचे भावी

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

नागरिक घडविण्याचे कार्य हे अभ्यासक्रम विकसनातून करित आहे. ही महत्वाची भूमिका समाजाची आहे. समाज व अभ्यासक्रम याचा अतूट संबंध आहे

## संदर्भग्रंथ

Gupta S. Education in india, Shipa Publications Delhi, 2007.

King R. Brownell John, the curriculum and the Discipline of knowledge, John wiley and sons Inc, New York, 1966.

Jalsara Maitreya, Principles of curriculum Reconstruction, Kanishka Publishers, Distriburers, New Delhi, 1999.

Balsara Maitreya, Principles of curriculum Reconstruction, Kanishka Publishers, Distriburers,New Delhi,1999.

Batia and Bharia, The principles and Methods of Teaching, Doabu House, Delhi, 1997.

Singh Uttam Nayak, Multicltrual Education (1997) Common Welth Publishers, Delhi.

Addyse Lane- Palagri Successful school Assembly Programs Parker Publishing Company, INC, West Nyack, N.Y.1971.

Rudyard K. Bent Lloyd E. McCann ADMINISTRATION OF SECONDARY SCHOOL MCGRAW HILL BOOK COMPANY, INC,NEW YORK TORONTO LANDON 1960.

Dr. S.N. Mukerji School Administraion and Function in India Shri J.O.Shah ACHARYA BOOK DEPOT, BARODA Second Edition 1963.

एस.पी. सुखिया स्कुल-प्रशासन तथा प्रबन्ध विनोद पुस्तक मंदिर आगरा 1988.

केशव प्रसाद विद्यालय व्यवस्था विनोद प्रस्तक मंदिर आगरा 1971.

रघुनाथ सफाया बी.डी. शैदा स्कुल-प्रशासन तथा प्रबन्ध धनपत राम एन्ड सन्ज जालन्धर दिल्ली चतुर्थ संस्करण.

डॉ. अरविंद दुनाखे डॉ. हेमलता पारसनिस प्रगत शैक्षकि व्यवस्थापन प्रशासन व वित्तिव्यवहार मिलिंद जोगळेकर दत्तवाडी पुर्ण (चिंतामणी प्रिंटस).

अटकोलकर पाटनकर शालेय व्यवस्थापन व प्रशासन.

डॉ. गुरूप्रसाद कक्कड डॉ. शशी गायकवाड शालेय प्रशासक व प्रबंधन विद्याप्रकाशन, नागपूर.

डॉ. ल.मा. शिवणेकर माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपध्दती श्री. गो. के. जोगळेकर नुतन प्रकाशन, पुणे.

डॉ अहेर हिरा उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक श्रीपाद मुंजे विद्याप्रकाशन, नागपुर.